
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)   UGC APPROVED JOURNAL NO. 48514   ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# लक्ष्मीकांत देशमुखांच्या कथेतील सामाजिकता आणि वाङ्मयमूल्य



**प्रा.डॉ.राजशेखर शिंदे**
**मराठी विभाग प्रमुख , दयानंद कला महाविद्यालय,**
**सोलापूर.**

**प्रस्तावना : -**

१९८० नंतर वाङ्मयीन वातावरणात काही बाह्य बदल दिसून येतात. महत्त्वाची काही नियतकालिक बंद पडली. एखादे दशक आधी सुरू झालेली अनियतकालिक म्हणजेच 'लिटल मॅगझीन चळवळ' ही थंडावली. नियतकालिकाचे वातावरण एकंदर वाङ्मय व्यवहाराला पोषक असते. कथा, कविता हे नियतकालिकांचे प्राधान्यक्रम असतात. अशा चळवळीबाबत उलटसुलट चर्चा चालू असताना लक्ष्मीकांत देशमुखांच्या कथालेखनाला नुकतेच कुठे सुरूवात झालेली दिसून येते. कथांजली, अंतरीच्या गुढगर्भी, पाणी! पाणी !, नंबरवन, अग्निपथ, सावित्रीच्या गर्भात मारलेल्या लेकी, मी आकाश जिंकणार आणि 'माणूस नावाचं एकाकी बेट' असे लक्ष्मीकांत देशमुख यांचे कथा लेखन आहे.

लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कथेच्या परंपरेहून भिन्न असा एक विशेष आहे. परंपरेच्या कथा व्यक्तीभोवती फिरणाऱ्या, एखाद्या दुसऱ्या व्यक्तीच्या सुखदु:खाचे चित्रण करणाऱ्या कथा नाहीत. देशमुखांची संवेदना समुहात आहे. समाजाच्या प्रश्नाला ते सामोरे जात जात राहिले. तिथेच त्यांना आपल्या कथेचे बीज अंकुरताना त्यांना दिसत राहिले. ते एक कुशल, कुशाग्र आणि समाजाप्रती निष्ठा असलेले प्रशासक म्हणून नावाजलेले आहेत. कल्याणकारी राज्याच्या योजना राबविताना आणि त्या आखताना त्यांना केवळ समाज हित दिसत राहिले. समस्याग्रस्त समाजाला दिशा कशातून दिसेल हे पाहत राहणारा एक कथालेखक म्हणून त्यांचा निर्देश करावा लागेल. त्यांची कल्पना आणि संवेदना यामध्ये पालट दिसून येतो.'अंतरीच्या गूढगर्भी' ही त्यांच्या सौंदर्यवादी संवेदना, परंतु त्यानंतर त्यांच्या कथाप्रवास संपूर्ण समाजशील वृत्तींचा राहिला आहे. 'अंतरीच्या गूढगर्भी' हा वरवर सौंदर्यवादी वाटणारा संग्रह, पण त्यातही अनेक गंडांच्या कथात्मशोध त्यांनी घेतला आहे.

'अंतरीच्या गूढगर्भी' त सेक्स भावनेचे आकर्षण जाणवते. प्रेम भावना ही आदिम भावना आहे. ती स्त्री - पुरुष सहवासातून व्यक्त होते. संग्रहामधील तीन कथानायक अविवाहित आहेत. पीएच.डी संशोधन मार्गदर्शकाशी न पटल्याने बँकेची चालून आलेली नोकरी धरतो आणि मैत्रिणींचे स्मरण करतो. त्यांच्याशी पत्रव्यवहारही करतो. "अस म्हणतात की हा प्लॉटोनिक प्रेमाचा प्रकार आहे व आज तो कालबाह्य आहे. आजचं मॉडर्न प्रेम शरीराच्या माध्यमातून जमतं व फुलतं. असेलही कदाचित . . . . पण माझा तर असा अनुभव आहे. मी मराठवाड्याचा आहे व एक औरंगाबाद शहर सोडलं तर इतरत्र साधं मुलीशी चार शब्द बोलणेही दुर्मीळ असतं. पुण्याला काय चाललयं याच्याशी आपल्याला कर्तव्य नाही. खुद्द औरंगाबादही खूपच मॉडर्न बनलं आहे. माझे अनेक मित्र आपल्या अफेरची रसीली चर्चा माझ्यापुढे करतात. खोटं कशाला सांगू, मला त्यांचा हेवा वाटतो." (स्वत:च्या मनाचा एक्सरे रिपोर्ट: ३५) अशी सुप्त इच्छा मनात अहेत. त्यांच्या सहवासात तो फुलारतो, त्यांची वृत्ती - प्रवृत्ती बहरून येते. सेक्स भावनेचे मुक्त चिंतन आहे. ती भावना म्हणजे काय यावर समंजसपणे, मोकळेपणाने कथारूपामधून विचार प्रकट झालेले आहेत. स्त्री - पुरुष मीलनाला सृजनक्रीडा समजली आहे. त्यामुळे विवाहाशिवाय आलेले मातृत्व मोठ्या आवडीने स्वीकारले जाते. रिटा म्हणते, "माझं मातृत्व स्वैराचार नव्हता. मी वासनेला नेहमीच दुय्यम - सेकंडरी समजते. पण माझ्यासारखीला - जी मॅच्युरिटीच्या एका विविक्षित पॉइन्टपर्यंत पोहचलेली आहे. - मला सेक्स - वासना कधीही प्रथम दर्जाची, सर्वाधिक निकडीची वाटणार नाही. ही विकृती खचितच नाही. कारण मलाही देहधर्म आहेत. पण देहाची कायमची सोय व्हावी म्हणून लग्नाच बंधन मला नामंजूर आहे."(सृजन कसा तडफड करी !पृ १६३)

सेक्स भावनेचा अत्यंत मोकळेपणा 'बास्टर्ड' कथेत आला आहे. शेवता पारधीण काळीभोर पण आकर्षक बांध आहे. तिच्या दारू गाळणाच्या कौशल्यामुळे नानासाहेब देशमुख तिला आपलेसे करतो. तीच त्याला ठेवून घेते.त्याच्यापासून तिला गोरागोमटा मुलगा होतो. देशमुखांच्या मृत्युनंतर ती पाटलाला ठेवनू घेते. याबद्दल तिचा मुलगा बबन विचारतो, तेव्ही ती आपल्या मुलालाच म्हणते, "तुला आज कळलं व्हय? आपलं समदं खुल्लम खुल्ला असतंया. अजून मी बुढी नाय झाले. अजून आग हाय इथं." आग असणाऱ्या जागेला हात लावून मुलाशी बोलणारी बाई विरळाच! या शेवंताविरूध्दच्या वर्तनाची देशमुखांची पत्नी , आई आणि 'हे खेळ मनाचे सारे ' कथेमधील श्रीची आई. तरुणपणी विधवा झाल्याने लहानश्या श्रीवर लक्ष केंद्रित करते आणि श्री डॉक्टर झाल्यावर सर्व स्थिरस्थावर झाल्यावर कामभावना उत्पन्न झाली तेव्हा तिचे

ती दमन करते. आणि तिच्यामध्ये भावगंड निर्माण होतो. तरुणपणात पुरुषसंग सोडलेल्या स्त्रीला आता प्रौढपणी, वृध्दत्वाकडे झुकतांना "साहचार आडवल्याने " ती भ्रम झाल्याप्रमाणे वागते."मी बाई आपली साधीसुधी, जुन्या बाळबोध वळणाची आहे. माझं पाऊल वाकडं पडणं शक्य आहे? मास्तर सारखं माझ्याकडे पाहतात, त्यांची नजर पापी आहे. ती माझा पाठलाग करते रे. मला भिती वाटते श्री!" श्रीची आई हे बोलते तेव्हा श्रीच्या मनात संशयाची पाल चुकचुकते. खरे तर बऱ्याच दिवसापासून मनात दडपून राहिलेली शिरीशिरी उफाळून येते; परंतु ती त्या भावनेचे अस्तित्व नाकारते आणि मनाच्या बेसावध अवस्थेमध्ये भयगंडासारखे वाटू लागले. लैंगिक सुखाची ओढ समजून उमजूनही ती नाकारते. मुलगा ह गोष्ट समजून घेतो आणि आईला शॉक ट्रिटमेंट देऊन घेतो. तिच्या मनातील वासनेचा निचरा होतो. 'ब्रदर्स फिक्सेशन' कथेत बहिणीला भावाची आंतरिक ओढ आहे. खेडाळू असणाऱ्या नवऱ्याला महत्त्व न देता आपल्या भावाचे कौतुक बहिण करते. दोघेही क्रिकेटर, मात्र ती भावाच्या ठिकाणीच पुरुष बघते आणि ताच्याशी नवऱ्याची तुलना करू लागते. नवऱ्याची विकीची डबल सेंचुरी हुकलेली असताना त्याचे तिला - स्विटीला - काहीच वाटत नाही. परंतु भावाचे कॅलेंडर इयरमधील रेकॉर्ड हुकल्याचे तिला बाईट वाटते. भावाचीही बहिणीविषयीची - स्विटीची - ओढ आहेच. बहीण आपल्या नजरेसमोरच राहावी, तिला हवे तेव्हा भेटता यावे म्हणून तरे बहिणीला आपल्या क्रिकेटर मित्राला देतो. त्याच्याशी तिचा विवाह झाल्याने त्याची समस्या सुटते. कुठल्याही देशात गेल्यानंतर तो बहिणीसाठी खरेदी करीत असतोच. विकी म्हणतोसुध्दा, "अरे भाई, आता ती माझी पत्नी आहे मी आहे ना, तिची हौस पुरवायला." तो शेवटी त्या नात्याला 'ब्रदर्स फिक्सेशन' असे नाव देतो.

सौंदर्याच्या ओढी, सुप्तावस्थेतील सेक्स, सृजनाचा साक्षात्कार या अंतरीच्या गूढगर्भातील विशेष गोष्टी होय. 'राधा', 'जोकर', 'सृजन कसा तडफड करी!', 'मर्सी किलिंग' या कथामध्ये सृजनाची निर्मिती प्रक्रिया प्रतिबिंबित झाली आहे. पु. शि. रेगे हे आत्मनिमग्न कवी. रेग्यांनी प्रेमभावना व वासना या गोष्टींना व्यक्तिवाची रूपातून काढून वैश्विक, चिरंतन असे भावरूप काव्यातून प्रकट केले आहे. रेग्यांची 'राधा', त्रिधा राधा, 'बुंथी', 'चापेचिया पिवळा पवळण . . . . .' या कविता प्रेमभावनेच्या नितांतसुंदर आवाहक स्वरूपाच्या आहेत.राधा- कृष्ण यांचा प्रेमविषयक भारतीय मनाला आवडता विषय आहे. ते लोभस मिथक भारतातील अनेक कलावंतानी उचललेले आहे. राधा - कृष्ण हे एकरूप, निरपेक्ष प्रेम कवितेत जसे प्रकटलेल दिसते तसे ते कथेमधून,लघुपट, काव्यातून घेणे म्हणजे कलेचे प्रकारांतरण होय. कलेला नुसतेच प्रकारांतरण नसुन ते एक श्रेष्ठतर रुपांतरणही झाले आहे. ज्या कवितांत कथेचे अंश नाही, त्य कवितांतून लघुपट तयार करण्यासाठी अभिजात अशी कलादृष्टी असावी लागते. निर्मिती अनेक पदरातून, प्रकारातून आपले आविष्कृत रूप घेते. 'राधा' लघुपटातून कविवर्य पुरु शिव रेगे त्यांच्या मृत्यूनंतर वाहिलेलह श्रध्दांजली होय. एखाद्या लेखकाला जागतिक स्तरावरही अशा पध्दतीने श्रध्दांजली वाहिलेली नसेल; असेलच तर क्वचितच. मराठीत तर अशा स्वरूपाचा हा पहिलाच प्रयोग आहे.

राधेचे भावविव्हल रूप आदिबंधाचा प्रतिमेतून प्रकट केले आहे. कृष्ण विषयरूप तर राधा आश्रयरूप आहे. ते 'त्रिधा राधा' या कवितेतून अप्रतिम दाखविले आहे. राधेच्या तीन रूपांचे अवस्थांतरण केले आहे. फुगडी, पार्श्वसंगीत, प्रकाश, ढगाळ, झाकोळ, वाडा, राजस्थानी शैलीतील चित्रे, पडदा, रंगीबेरंगी परंपरागत वेषभूषा एवढ्याच साधनावर एक लघुपट तयार करणे कठीण. राधेचा उत्सूक शिणगार, तिची अधीरता, भावविभोरपणा दाखवून पडद्यावर दृश्यमालिका दाखविणे अवघड गोष्ट सोपी केली आहे. नुसते याच कथेत हा लघुपट येत नाही, तर सौंदर्याची सहजाणिवेच्या रसिकांना लक्ष्मीकांत देशमुखांनी साक्षात प्रतीती दिलेली आहे. सौंदर्याचा आविष्कार स्व- जाणिवेतून प्रकट करणे तसे सुलभ आहे. परंतु झालेल्या एका उत्कट भावनेमधून पुन्हा नवनिर्मिती - ही खचित दुष्कर. ते येथे साकार झाले आहे.

प्रशासनातील आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे दौरा. दौऱ्यावर जाणे, दौऱ्यात सहभागी होणे, दौऱ्याचे ब्रीफिंग करणे या गोष्टी प्रशासनाचा भागच बनून राहिल्या आहेत. औरंगाबाद जिल्ह्यातील दुष्काळाची पाहणी करण्यासाठी काही महत्त्वाचे पत्रकार(दौरा) आले आहेत. त्यामध्ये माणदेशाचा (सोलापूर जिल्हा) प्रदीप एक पत्रकार होता. त्याने माणदेशात दुष्काळ फार जवळून पाहिला आहे. दुष्काळी भागाचे जेष्ठ पत्रकारासमवेत पाहणी करण्यासाठी आलेल्या प्रदीपच्या पदरात निराशा पडते. पत्रकार हा लोकशाहीला मदत करणारा, पारदर्शीपणा अबाधीत ठेवून जनतेला सत्य कथन करणारा एक महत्त्वपूर्ण काम पाहणारा घटक असतो. तो शासनधार्जिणा झाला तर जनतेला अंधारात ठेवण्यात शासनाला यश येते. प्रदीप ज्या काळात पाहणीच्या दौऱ्यावर आलेला आहे त्या दौऱ्यात वरिष्ठ पत्रकार आहेत. वृत्तांकन वस्तुस्थितीला सोडून करण्यात त्यांची हयात गेलेली आहे. प्रदीप नवखा आहे. पत्रकारांकडून काही शिकू पाहणारा, संस्कार करवून घेऊ पाहणारा आहे. परंतु भ्रष्ट पत्रकार त्याला चांगले, सखोल(दुष्काळाची पार्श्वभूमी माहीत असल्याने) असलेले प्रश्नसुध्दा विचारू देत नाहीत . उलट मुंबईला आल्यानंतर त्याचे बातकीपत्रही छापली जाते. सहकार सम्राट हे औरंगाबादचे पालकमंत्री असल्याने व वृत्तपत्र त्यांच्या कृपाप्रसादावरच चालत असल्याने बातमी फिरवून छापली जाते. देशमुखांना पत्रकारितेचे आकर्षण नाही. परंतु ते ज्या हायप्रोफाईल पेशात आहेत त्याचे पत्रकारितेशी जवळचे संबंध असतात. पत्रकारिता एक माध्यम आहे.. पण या माध्यमाचा शासन आपले साधन म्हणून वापर कसे करते ते लक्ष्मीकांत देशमुख यांनी 'दौरा', 'दास्ता ऐ अलनूर कंपनी' या कथात फार पोटतिडकीने दाखविले आहे.

राज्यांत कल्याणकारी योजनांची पोटतिडकीने अंमलबजावणी करतात ते शासकीय अधिकारी.'जगण्याची हमी ' मध्ये घटनादत्त सामाजिक न्यायाचे अभिसरण सर्जनाच्या रूपात केले आहे. भटक्या जातीतील आठवी नापास किसन कैकाडी गावाचा पोलीस पाटील होतो. राखीव जागा असते. किसनला पाटीलकीची नशा चढते. सारजाला असे अप्रामाणिक जगणे नको वाटते. ती कष्टाळू, हुशार आहे. प्रशिक्षणार्थी

कलेक्टरबाईंना प्रभावित करण्याएवढी हुशार आहे. बाई सारजाची केसस्टडी करते. 'रोजगार हमी कामाचा स्त्रीजीवनावर परिणाम' हा विषय त्या आपले असाईनमेंटस् करतात. प्रामाणिक अधिकारी आहेत.

अशा प्रामाणिक, प्रांजळ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे दर्शन 'ऑपरेशन जिनोसाईड' कथेत पडते. ज्योती मराठे या तहसिलदार रात्री ०८:३० कलेक्टर फोनवरील आदेशानुसार तालुक्याच्या ठिकाणी. आपल्या पित्या बाळाला सासूबाईकडे ठेवून जाते. हे सारे पाहिले की समाज घडणीमध्ये अधिकाऱ्यांच्या मोठाच हातभार आहे, हे धान्यात येते.

'नंबर वन' हा खेळाडूमधील माणसाच्या कथा असा वेगळीच थीम असणारा संग्रह आहे. लोकांच्या मनात सिने नट - नट्यानंतर गॉसिपिंग असते. ते खेळाडूबद्दल. खेळाडू एकदा प्रकाशात आला की, त्याच्यामागे पैसा व प्रसिध्दी या गोष्टी अपरिहार्यपणे जोडून येतात. पण खेळाडूची त्यामागची शरीर मेहनत, कष्ट, कसरत या गोष्टी बाजूला पडतात. लक्ष्मीकांत देशमुख खेळाडूंवर कथा न लिहिता त्यांच्यातील माणसावर लिहितात. हा देशमुखांचा नेहमीच 'आऊटफिट' असा विषय आहे. लक्षितांच्या दुर्लक्षावर त्यांचा कॅमेरा बरेच काही काही टिपत असतो आणि त्यांना प्रमुख प्रवाहधारेत आणत असतो. ते माणुसपणाला हेरतात. त्यांच्या कुतुहलाचा विषय माणसातील निरागसपणा, निःस्पृह निर्ममता आहे. 'प्रयासे जिंकी मना', 'बंद लिफ्ट', 'रन बेबी रन', 'फिरूनी नवी जन्मेन मी' कथा मनात घर करून राहतात.

देशमुख समूहाला पाहतात. समूहाच्या सुखदुःखाला अग्रक्रम देतात, समुहाच्या हितैक्याला बाधा पोहोचणार नाही याकडे अत्यंत दक्ष व हेतुतः लक्ष देऊन असतात. 'पाणी !पाणी!', 'सावित्रीच्या गर्भात मारलेल्या लेकी' या संग्रहातून समूहाला, समाजाला आपल्या कवेत घेतले आहे. आपला प्रतिभाधर्म त्यासाठी पालवित करतांना दिसतात. 'नंबर वन' खेळाडूमधील माणसांच्या कथांत ते समुहामधुन एकटेपणाच्या पातळीवर येऊन त्याच्यामधील एकट्यातील विजिगीषू वृत्तीचे दर्शन घडवितात. सुंदर संस्कारांनी समृध्द नि संपन्न झालेला माणूस एकाकी होताना या अवनीवरच्या मानव्यसरोवरापासून लांब जाऊ शकत नाही. त्याच्यामधील खेळाडूमध्ये हिणकस समाजकारण कसे भिनत जात आहे. याचे स्वाभाविक दर्शन घडवितात.

'रन बेबी रन', 'बंद लिफ्ट' या देशमुखांच्या कथा म्हणजे त्यांचे केवळ मानवतेवरील प्रेमदर्शक होय. बेबी ग्रामीण भागातील धावपटू आणि तिचे दलित कोच - गुरू यांच्या प्रांजळ गुरू - शिष्य नात्यातील पावित्र्य दुर्दैवी शोकात्मिका आहे. तिच्या नवऱ्याला गुरु - शिष्य नात्यातील पावित्र्य कळत नाही. तो संशय घ्यायला लागतो. दिसायला देखणा, हॉटेल व्यवसाय घराण्यांनं खानदानी असलेलला बेबीचा नवरा मनानं किडलेला, विचारानं बुरसटलेला आहे. राष्ट्रीय क्रीडापटू - धावपटू असलेली बेबी ऑलिंपिक स्पर्धेच्या निवड चाचाणीची तयारी करीत असताना लग्न होते आणि ती क्रीडाजीवनाला मुकते. तिची सारी स्वप्ने धुळीस मिळतात. सर्वोत्कृष्ट परफॉमन्स करायला तयार असलेली एक मुलगी संखयाला बळी पडते. आणि पोटात मुलीचा गर्भ आहे, म्हणून तो पाडला. या सर्व गोष्टींना बेबी वैतागलेली, पिचलेली, मनानं खचून गेलेली दिसते. 'तुला गर्भार केली तर गुंतून राहशील' म्हणून तपासणी केली तर कळते - ती पुन्हा आई होणार नसल्याचे. बेबीचे उद्‌गार आहेत. "एकाच वेळी त्याचा विषाद वाटत होता आणि हायसंही. सैतानाचा गर्भ तसाच पुढं सैतान निपजला तर !" ( नंबर वन : ११७) धावण्याच्या स्पर्धेत अखेर बेबी जगाच्याही पुढे जाते.

बेबीचा गुरू मागासवर्गीय, पण बेबीच्या मनात कळत नकळत तिच्या गुरूच रूतलेला आहे, पण याचा उलगडा तिला होत नाही. तिला कोच, गुरू , फादर, फिलॉसॉफर असेच त्याचे प्रकट रूप दिसते. कोणतं पाप मनात उत्पन्न न होताही बेबीच्या नवऱ्याच्या - बालाजीच्या - मनात पाप पक्क बसलेले होते. या साऱ्याला वैतागुन बेबी स्वतःला पेटवून घेते. तिचा गुरूविषयीचा आदरभाव एवढा, की तिच्या चितेला भडाग्नी आपल्या कोचनेच द्यावा, अशी तिची इच्छा असते! या कथेला राष्ट्रीय धावपटू नंदा जाधव हिच्या करूण शोकांतिकेची पाश्र्वभूमी आहे. शोकांतिका देशमुखांना घेतली असलेली तरी रिपोर्टवजा असे काही यात नाही. मन गदगदणाऱ्या प्रसंगाना त्यांनी योग्य कलात्मक न्याय दिला आहे.

'प्रयासे जिंकी मना' - जलक्रीडापटू असलेल्या दीप्तीचा नवरा दिलीप, मोठा मुलगा अजित हे दोघे पाण्यातच मृत्यू पावतात. दीप्ती राष्ट्रीय जलक्रीडापटू असूनही तिच्या मनात पाण्याची भीती घर करते. परंतु धाकटा मुलगा जयंत लपून जलक्रीडापटू होतो. आणि राष्ट्रीय स्पर्धेत अव्वल येतो. पाण्याची भीती पाण्यानेच काढली जाते. या तशा साधारण वाटणाऱ्या कल्पना आहेत. परंतु कथालेखकांनी या साध्या कल्पनेतील असामान्य मानसिक गुंतागुंत फार सुरेख केली आहे. कथेची लांबी - रुंदी कथेला न्याय देणारी नसते. कथेतील उठावदार, सौष्ठवपूर्ण जे वलय मिळते ते कथेला उंची देतात. ही वलयांकीत उंची प्रस्तुत कथाकरांचा सर्वच कथात पाहायला मिळते. 'प्रयासे जिंकी मना' या कथेत खेळाडूतला माणूस उभा राहतो. तसा 'बंद लिफ्ट' मध्ये खेळाडूतला माणूस कोसळत जातांना दिसतो.

'बंद लिफ्ट' कथेत हॅम (विनोद कांबळ) क्रिकेटपटूंची कारकीर्द त्याच्या अनिश्चित खेळाने, त्यच्यातील नखरेलपणामुळे, त्यतील बेपावईने संपुष्टात येते. सॅम( सचिन तेंडुलकर) त्याचा हॅमचा जिवाभावाचा मित्र. हॅमच्या नैसर्गिक खेळ सॅमपेक्षा चांगलाच. सॅमला नशिबाने साथ दिली. परंतु हॅमला देव आणि माणसांची साथ मिळालीच नाही. कित्येक खेळाडू आले आणि गेलेही. टी ट्वेंटीतील एक खेळाडू तर (मध्यप्रदेश) आता शेतीमध्ये रोजंदारी करतोय हॅम आपल्या वर्तनाचे , खेळातील अपयशाचे खापर जातीय प्रवृत्तीच्या मुळावर फोडतो. कमकुवत झालेले मन, घटनेमुळे अधु झालेले मन , सामाजिक न्यायाची प्रतिकुल दिशा अगतिकतेमधून स्वीकारते. हॅमसारख्या श्रेष्ठ खेळाडूच्या मनात सामाजिक वितुष्टभाव कसा निर्माण होतो हे सांगतांना कथाकार समाजकारणाची लंगडी बाजू प्रकाशित करतात. दक्षिण आफ्रिकेत दरबानला आयोजित स्पर्धेत हॅमला आंमत्रित केले जाते. तेथे हॅम समाजकारणाची घाणेरडी बाजू शिकतो 'तिथं मला काही महाराष्ट्रातील दलित

नेते कार्यकर्ते भेटले व त्यांच्याबरोबर त्य परिषदेत सहभागी झालो. इट वॉज ॲन आय ओपनर फार मी सॅम. तिथंच मला माझ्या कास्टची , त्याहून जादा त्यामुळे होणाऱ्या डिसक्रिमिनेशनचीजाणीव झाली.मला जे माझ्या विरूध्द सौरभ, राहुलच्या संदर्भात वाटायचं, त्याला एक प्रकारे पुष्टी मिळाली.' (नंबर वन ८४) १९९५ साली मुहमद अझरूद्दीनही म्हणाला होता की, " मी अल्पसंख्याक असल्याने माझ्यावर मॅचफिक्सिंगचे आरोप होत आहेत." तेव्हा मन्सूरअली पतौडींनी व इतर मुस्लीम क्रिकेटर्सनी अझरूद्दीनला प्रश्न केला होता. "मग तुला भारतीय क्रिकेट टीमचा कॅप्टन केलाच नसता!" असे सुस्पष्ट बोलणारे किती नवाब आहेत? लक्ष्मीकांत देशमुख फितवला गेलेल्या हॅमच्या मनातील गदळ दु:खाचा 'सामाजिक व्यक्तिन्याय' अशा रितीने प्रकट करतात.

'कास्ट बायस' जसे मुखरित झाले आहे तसे 'जेंडर बायस' ही मुखरित झाले आहे. लिंगावरून मीना He की She हा प्रश्न उपस्थित होतो. आणि जेंडर बायस कारण पुढे करून मीनाचा बळी पडतो. ऑलिपिंक परिषद तिचे रौप्यपदकही काढून घेते. तिच्यापेक्षा कमी योग्यतेची सानियाकरवी सारा खेळ उभी होतो. खेळातील राजकारण किती हिडिस असते. असते याची कल्पना सर्वसामान्यांना या कथेतून येते. परंतु किसनला हळूहळू पाटीलकीची नशा चढते. गावातील फुटकळ दारू पिऊ लागतो. सारजा त्याची पत्नी - या गोष्टीला नंतर कंटाळते. प्रामाणिक जगण्याला महत्त्व देते. रोजगार हमी योजनेवर प्रशिक्षणावरील कलेक्टर अधिकारी बाई सारजाच्या विचाराने प्रभावित होते. आपल्या असाईनमेंटसाठी ती 'रोजगार हमी कामाचा स्त्री जीवनावरील परिणाम' हा विषय ती सारजाच्या आधारेच करते, हे सारे होऊन, अधिकारी मागास समाजाच्या पाठीमागे उभे राहूनही, समाजसुधारणा होत नाही याचे कारण समाजाच्या मानसिकतेमध्ये बदल झालेला नाही.

माणसं जिवंत ठेवणाऱ्या खेळाडूंमधील सामान्य माणूसपणा दाखविणाऱ्या लेखकांनं स्त्रीभ्रूणाच्या संवर्धनासाठी पुढाकार घेऊन 'सेव्ह द बेबी गर्ल' म्हणत आपल्या प्रतिभेचा अमिट ठसा उमटविलेला आहे. सुरुवातीला पाहिले आहे की, देशमुख हे प्रशासकीय अधिकारी होते आणि त्यांनी आपल्या सृजनशिल व्यक्तिमत्त्वचा उपयोग आपल्या प्रशासकीय कार्यात करून घेतला. परंतु ते सर्जन, नवनिर्माण असे वाङ्मय आहे. 'सावित्रीच्या गर्भात मारलेल्या लेकी' या कथा संग्रहाच्या प्रस्तावनेत पुष्पा भावे म्हणतात की, 'सेव्ह द बेबी गर्ल' या उपक्रमासाठी आणि त्या उपक्रमाचाच ललित दस्ताऐवज असणाऱ्या कथांसाठी मराठी वाचक देशमुखांचे वाचक आभार मानतील. देशमुखांनी समाजाला उपकृत करून ठेवले आहे.

'मुली वाचवा' असा उपक्रम सरकारला हाती घ्यावा लागला. मुळातच मुलगा वंशाचा दिवा असा समज कोणत्या शास्त्रीय सत्यांतून निर्माण झाला हे पाहणे समाजशास्त्राचे काम आहे. पण या संबंधीचे समाजाची मानसशास्त्रीय चिकित्सा करून म्हणता येईल, की तो स्वार्थी आहे. म्हातारपणी आपले देखभाल करणारे, आपला सांभाळ करणारे आपल्या हक्काचे कुणी असले पाहिजे. ते आपलेच रक्त संबंधी असतील तर ते काम जबाबदारीने होईल - या स्वार्थी कल्पनेला वंशाचा दिवा ह्या समाजाची जोड देण्यात आली. आणि तेव्हापासून जेंडर बायस सुरू झाले. मुलींचा दुस्वास करणे, दुर्लक्ष करणे, छळ करणे, तिच्या वाढीला वान न देणे या गोष्टी पूर्वी होत. तिच्या विकासाला तर संधी दिली गेली नाही. स्त्रीच्या विकासाच्या संधीचे प्रमाण अत्यल्प होते. अशा लोकविचारात शास्त्रीय शोध शोधून गर्भलिंग - तपासणी यंत्र रासवट वृत्तीच्या डॉक्टरांच्या हाती आले. वंशदिवा अपेक्षितांचाही हर तिसऱ्या डोळाच ठरला.

कितीतरी सहस्र आईबापांनीच मारून टाकल्या. ही प्रवृत्ती किती क्रुर आणि हिडीस म्हणतो? अर्भक कुत्र्याने खावे? आणि त्यासाठी डॉक्टराने वाघासारखे कुत्रे पाळावे ही केवळ कपोलकल्पित घटना म्हणावी? तर बीडमधील डॉ.मुंड्यांचा क्रौर्याचा इतिहास हेच सांगतो, की त्यांनी शेतामध्ये कुत्र्यांचे फौजच पाळली होती. 'लंगडा काळकृष्ण' ही कथा अत्यंत हृदयद्रावक आहे. बायकावर अतोनात प्रेम करणारा नवरा मिळाला म्हणून स्वर्गीय सुखाने आनंदणारी पत्नी एके दिवशी नवऱ्याच्या हॉस्पिटला जाते. आणि खोलितील दोन कुत्रे बाहेर पडतात. दुलईल लपेटलेले बाळ कुत्रे पाहतात. कुत्र्यांना ओल्या जावळाचा वास सवयीचा झालेला असावा. ठेवलेले बाळ त्यांना सवयीने आणि तेही आपल्या भक्ष्यदाता विशिष्ट वेळेला समोरून जातो म्हणजे त्यांच्यासाठी ते आमंत्रणच. कुत्र्यांनी डॉक्टरच्याच बाळाच्या पायाचे लचके तोडले! रोमान्ससाठी कुतुहल, सुखी - समाधानी स्त्रीचे दर्शन आणि दुसरीकडे क्षणाक्षणाला किडा - मुग्यांना आदिवासींनी मारून खावे तशी डॉक्टरची पैशांची हाव - नाट्यपूर्ण कल्पनाविस्तार, वास्तवाचे थैमान, स्त्रीचे उद्ध्वस्त होणे, डोळयादेखत कुत्र्यांना अर्भक खाऊ घालणे, प्रत्यक्ष याची देही याची डोळा हे सारे फेडण्यासाठी स्वतःच्या बाळाला अक्षरशः कुत्र्यांना देणे ही अशी फॅंटसी इंग्लिश सिनेमात होत नसावी? अत्यंत खुबीने हे सर्व शब्दांकीत केले आहे.

देशमुखांचे हे काम फार मोठे आहे.महात्मा जोतिराव फुल्यांच्या पुरोगामी महाराष्ट्रातच पुन्हा लक्ष्मीकांत देशमुखांनी स्त्रीला कात्रीतून वाचवण्याचा अक्षय प्रयत्न केला. फुल्यांनी स्त्रीला शहाणी केली, महात्मा गांधीजीनी तिला सार्वजनिक जीवन दिले तर देशमुखांनी तिच्या जन्मासाठी स्वागतशील प्रवृत्ती व मानसिकता तयार केली. या संग्रहातअविस्मरणीय आठच कथा आहेत. त्यामधून स्त्रीच्या जगण्याचा, तिच्या माहेरून येण्याच्या प्रवृत्तीचा साक्षात्कार होतो.

देशमुखांच्या कथावाङ्मयातील मूल्याविषयी बोलण्यापेक्षा जीवनमूल्यांची व सामाजिक मूल्यांची समीक्षा करणे गरजेचे वाटते. कारण ही मूल्ये देशमुखांना चिंतनिय वाटतात. त्यांच्या पहिल्या संग्रहातील मूड नंतर राहिलेला नाही . भगभगीत सत्य त्यांना अस्वस्थ करीत असावे. सर्व सुखे, सर्वस्व समोर असतानाच्या बेधुंद अवस्थेत विवेक हरविलेल्या मनात प्रबोधनाची आवश्यकता यंत्रवतजीवन जगणाऱ्या माणसाला असते. आपल्या कथासाहित्यात श्री.लक्ष्मीकांत देशमुख असे मानसिक सबलीकरण व लालित्यामधून वैचारिक प्रबोधन करतात, अशी नोंद मराठी वाङ्मयइतिहासात होईल.

देशमुखांच्या वाङ्मयाचा परीघ क्षितिजासारखा आहे. कथेच्या एका पुस्तकात ते विस्तीर्ण असून कुठेतरी आकाश जमिनीला टेकल्यासारखे वाटते. पुन्हा नवीन पुस्तक घेतले की आकाशाची कडा तिथून उठल्यासाखी दिसते, लांब होऊन विस्तीर्ण होते आणि रंगाची आभा मोठी विलोभनीय होऊन प्रकटते. आधीच्या चार पुस्तकांहून वेगळी धुमारे असणाऱ्या 'अग्निपथ'चे असेच आहे. 'अग्निपथ' चे प्रबोधन तरुणाई विरूध्द मुर्दाड झालेली संवेदनयून्य आधीची पिढी असा संघर्ष आहे. उरात स्वप्ने आहेत, पण त्या स्वप्नांचा चक्काचूर झाल्याचे दिसून येते. ही तरूणाई काहीशी व्यवहाराने वागते. तसा निर्णय घ्यायला प्रस्थापित पिढीच प्रवृत्त करते. याला अपवाद आहे ती 'गद्दार' ही हुकुमशाहीचे दर्शन घडविणारी भयंकर कथा.

देशमुखांच्या कथेची वाचनीयता हे मूल्यविशेष आहे. लेखक म्हणून ते शब्दरचना करीत नाहीत. अनुभूतीच्या, आविष्काराच्या अपरिहार्यतेमुळे ते कथालेखन करतात. कथालेखनात लेखनाची सारी तंत्रे उन्मळून त्यांच्यासमोर येतात. ते भाषेचे केवळ रंगभरण करतात. कोणत्याच कथेचा तोंडवळा एकमेकासारखा नसतो. आशयाची आवश्यकता म्हणून हिंदी भाषेत ते सहज संचार करतात. ती सफाईदार आहे. महत्त्वाची गोष्ट , भाषेत कृत्रिमपणा नाही आणि अलंकारिक सोस धरत नाहीत. भाषेचा निरतिशय साधेपणा हाच अंगभूत सौंदर्य आहे. जातीच्या सौंदर्याला आभूषणाची गरज नसते, तसं देशमुखी कथासौंदर्याचे आहे. कथेचा आशय जोमदार असतो, की त्याला सजवायला तोशीस घ्यावी लागत नाही. हे देशमुखांचे आविष्कारविशेष आहे, की ते चार - चौघांसमोर घटनेचे कथन करीत आहेत, असे त्यांनाच जाणवत असल्याने भाषेच्या डौलाविषयी ते जागृत दिसतात. भाषेचा साज त्यांना 'सादगी' त वाटतो. ही अनुभूती 'अग्निपथ' मधून येते.

'अग्निपथ' च्या बारा कथांचा एक घोस आहे. प्रशासनातील भ्रष्टता, ग्रामजनांची विनातक्रार सोशिकता, शिक्षणसम्राटांची गल्लाभरू वृत्ती, समाजाचे हितरक्षणासाठी राजकारणात जाऊन व्यक्तिगत ममतेचा अनिवार मोह, जात - पात व औरस - अनौरस कल्पना, बालमजुरी व बालगुन्हेगारी, देश बांधवांच्या स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य व जगण्यासाठी लाचार, दंगलीत माणसे मारण्याची स्पर्धा, नातेसंबंधाची फसवाफसवी हे सर्व विषय वर्तमानकाळी थीमबेस असलेले आहेत. वर्तमानकालीन भविष्य, त्या काळातील तरूणांचा असतो. एकीकडे बाजारपेठांच्या प्रचंड स्पर्धेमुळे, व प्रचंड निकडीमुळे खुले धोरण स्वीकारले जात आहे म्हणून दुसरीकडे वैश्विकीकरण अनुभवत आहोत. या दोन्ही गोष्टींच्या परिणामांना सामोरे जावे लागते ते दुर्बलांना, अगतिकतेला, शुभशकुनांच्या, पवित्र - अपवित्राच्या, राष्ट्रप्रेम, समाजप्रेम, नातसंबंध या संबंधाना कवटाळून बसणाऱ्यांना. उदार आणि सहिष्णु अंतःकरणाचा लेखक आपले विचार ललितरम्यतेमधून प्रकट करतो तेव्हा वाकाला माणूसपणाच्या सर्व भावना, वेदना, संवेदना प्रतीतीला येतात. स्पर्धेचा महामार्ग खुला झाला की त्यावर सांडलेल्या रक्ताचे नाते माणुसकीशी राहत नाही, स्वच्छ रस्त्यावरची ती केवळ घाण असते. या विषयीची सहसंवेदना लक्ष्मीकांत देशमुखंनी मुखर केली आहे.

'लाईफ टाईम फार्च्युन' कथेला घटितांचे कितीतरी संदर्भ आहेत. १९९९ साली महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षाला अटक झ ाली, ही कथा लिहुन प्रकाशित झाल्यानंतर सांगलीच्या सचिन माळी, त्याची पत्नी शीतल साठे यांना सक्रीय नक्षलवादी म्हणून अटक झाली, अशा अनेक संदर्भाचा उगाळा म्हणजे 'लाईफ टाईम फार्च्युन' कथे आहे. नामदेव, सिध्दार्थ, नेहा या प्रॉमिसिंग ( होतकरू) तरुणांना ती अटक झ ालेल्या एम.पी.एस.सी. माजी अध्यक्षाच्या तोंडाला चिखल फासला म्हणून. अध्यक्षांना पैसे घेऊन दोन भावंडाना डी.वाय.एस.पी. पद 'चक्क' दिले होते. (म्हणजे ऑलिपिक मध्ये ब्राँझ - कास्यपदक मिळविले म्हणून डेप्यूटी कलेक्टर पद 'पदक' रूपाने द्यावे असे!) या घटनेमुळे विरूध्द झ ालेली, अशा पदांची ध्येयाकांक्षा बाळगून मेहनत घेणारी तरुणाई तोंडाला काळे ( चिखल) फासण्याचे काम करते. त्यांना अटक होते. सूर्यवंशी नावाचे म.से.लो.आ. चे सदस्य त्यांची जामिनावर सुटका करतात, परंतु ही तरुणाई कधी - कधी आततायी वागते.

सिध्दार्थ व नेहा नक्षलवादी होण्याचा निर्णय पत्रकार परिषदेत जाहिर करतात तर नामदेव 'देशाचा प्रामाणिक अधिकारी नको असतील तर नको, मी खाजगी मंडळात मोठ्या पगारावर नोकरी करेन' हे जाहीर करतो. ध्येय बाळगणाऱ्यांत संयम असावा लागतो. कारण जे साध्य करायचे आहे ते साधन प्राप्त करायचे असेल तर अनेक प्रकारांची स्पर्धा असते, हे न कळण्याइतपत स्पर्धाशील मनोवृत्तीचा तरुण नसतो. स्पर्धा म्हणजे गुणांच्यावर मात करणे. चांगुलपणावर निष्ठाअसणारे तरूण अधिकारी होता येत नाही म्हणून आत्मघात करून घेत नाही. आपल्या ध्यासाचा उपयोग ते अन्य ठिकाणी करतात. ही प्रचंड नैसर्गिक साधनसंपत्ती वाया जाऊ नये म्हणून स्वहित धोक्यात घालुन धडपडणारी सूर्यवंशीसारखी माणसे सदैव दक्ष आहेत. असे असताना टोकाच्या निर्णयाप्रत जाणारी अपरिपक्व विचारांची तरुणाई दिसून येते. या कथेत विचार आणि योग्य कृती यातील संघर्ष पाहावयास मिळतो. कथेत नाट्य आहे आणि भावनाप्रधान कृतीने कथा शिगोशिग झाली आहे.

आपापल्या अस्मितेच्या शोधामधून, संरक्षणामधून नक्षलवादी जन्मास येतात, परंतु भूमिका तार्किक असली तरी तरे मार्ग आणि अवलंबिलेली प्रणाली फार घातक असते, कसे ते 'लाइफ टाईक फार्च्यून' कथेत फारच सहजसुंदरतेने प्रकट झाले आहे.

भारतीय संस्कृती निवृत्ती आणि प्रवृत्तीच्या संघर्षात अजूनही अडकलेली आहे. आणि हा संघर्ष आहे म्हणून प्रतिकूल जगणे होत आहे. याचे फार स्वाभाविक प्रत्यंतर 'भव शून्य नादे' या कथेमध्ये देशमुख देतात. त्यांच्या प्रज्ञा - प्रतिभेचा सुंदर मिलाफ या कथेत झाला आहे. मानवी मनाला मृत्यूचे तत्वज्ञान नेहमीच मोहित करीत आले आहे आणि आध्यात्मिक तत्त्वज्ञानावर तर ती मोहिनी भवसागरात तरून जायला पुरेशी आहे.

परभणीच्या तामुलवाडीला नेहमीच पुराने वेढलेले असते. कित्येक वर्षांची समस्या सुटलेली नव्हतीच. प्रखर इच्छाशक्तीचा अभाव! अक्षयसारखा ध्येय घेऊन आलेला सरकारी अभियंता तामुलवाडीला येतो. तेथील नैसर्गिक अवकृपेने दीर्ण - विदीर्ण होतो. या परिस्थितीचा एकच आणि उःशाप म्हणजे 'शिवशंभो हर हर शिवशंभो!' मोरया गोसावी. निर्मम, निरागस आणि निःस्पृह योगी - भावशून्यात आत्मानुभूतीचा

प्रकाश देतो. तेवढेच मरण सुसह्य करतो. राजकारणी व अधिकाऱ्यांची भावनाशून्यता, अस्मानी सुलतानी चोहोबाजूंनी प्रतिकूलता यांचे भयानक तांडव 'भव शून्य नादे' मध्ये दिसते. गाव पुराने वेढले जाऊन संपर्क तुटतो. बाळंत - वेदना सहन करण्यासाठी तंबाखूची गोळी भरविली जाते!

अधिकारी येतात नि अधिकारी जातात. व्यवस्थेची पोलादी चौकट तोडू न शकणारा अक्षयही नोकरी सोडून मुंबईला जातो. मोरया गोसावी जलसमाधी घेतात आणि मास्तरांच्या अडलेल्या लेकीच्या पोटी मोरया म्हणून जन्म घेतात. परंपरेच्या समजातून कथाकारांनी फार मोठे सूचन केले आहे. व्यवस्था बदलणार नाही. मोरया गोसावीसारखे निर्भिक सज्जन जगण्याला बळ देतात. भारतीय व्यवस्थेत हा सनातन संघर्ष तर नसावा ना? अशी शंका कथेच्या अखेरीस उत्पन्न होते.

आपल्या संपूर्ण घराण्यात हा असा कुरूप निपजला म्हणून! शेजारची बन्सी त्याला आपल्या उफाड्याने आमंत्रित करते, पण वडिल आल्याने ही त्याच्यावर उलटते. देसाई पती - पत्नीला मुळातच तिरस्कृत वाटणारं हे कुरूप रूप. त्याला बेदम मारून डांबून ठेवतात आठ दिवस. ग्लानीतल्या संजयला सिस्टर अग्नेस ममतेने कवटाळतात. संजय मोठा चित्रकार होतो. जन्म न देणाऱ्या सिस्टर अग्नेस संजयच्या बक्षीस वितरण समारंभास उपस्थित नसतात. विमान अपघातात तिचा दुसराही मुलगा, सून, नातू मृत्यूमुखी पडतात. उद्ध्वस्त झालेल्या अग्नेसला संजय मातृपद देतो. आईबापांना 'नेव्हर सी यू अगेन' असे सांगतो. त्याला जन्मभराचे वात्सल्य सिस्टर अग्नेसकडून मिळते. तर 'कमल ' एक वर्षाची असताना अनाथालयातून स्वीकारली गेली होती हे सत्य नवरा असणाऱ्या देसायला कळते. तेव्हा जात, रक्त असे प्रश्न उपस्थित करतो. जणू कमलचे बालपणच अनौरस असल्याप्रमाणे. 'बच्चू' ही कथा मातेने टाकून दिलेल्या अनाथ मुलांची . 'सर्वात कठीण काम' ही कथा दंगलीत मुलांना ठार करण्याचे कठीण काम सांगते, तर 'नशिबाचा खेळ' मतिमंद विकलांग नवऱ्यापासून झालेल्या तशाच बाळाला भविष्यातील घृणास्पद गोष्टीपासून मुक्त करण्यासाठी मारून टाकते. या कथांमधुन हळवेपणा स्पष्ट होतो आणि ही एक मोठी सामाजिक समस्या आहे, हे ते कथेमधून सांगतात.

'कश्मीर की बेटी' व 'गद्दार' या राष्ट्राभिमान व जाज्ज्वल्य देशप्रेम व्यक्त करणाऱ्या कथा आहेत. माझ्या पिढीतील दोन घटना स्पष्ट आठवायला हरकत नाही. नव्वदीच्या दशकामध्ये तत्कालीन गृहमंत्री मुक्ती मुहमद सैद यांच्या मुलीचे अपहरण नाट्य . बदल्यात सोडलेले अतिरेकी आणि त्यानंतरच्या आठ - एक वर्षांनी कंदहार विमान अपहरण (डिसेंबर १९९९) व स्वतः संरक्षणमंत्र्यांनी आय.एस.आय. च्या कट्टर अतिरेक्यांची कंदहारला विमान नेऊन केलेली सुटका.

त्या पार्श्वभूमीची 'कश्मीर की बेटी' ही कथा देशाभिमान जाज्ज्वल्य करणारी आहे. डॉक्टरकी करणाऱ्या लेकीचे अतिरेक्यांनी केलेले अपहरण आणि अपत्यप्रेमापायी शरण आलेले तिचे गृहमंत्री वडील यांच्यावरील कथा आहे. जिचे अपहरण झाले होते ती राजकारणापासून लांब होते. तिची धाकटी बहीण (निकाह) राजकारण हा वडिलांचा वसा घेते, परंतु धाडसी, निर्णय घेण्यात चपळ आणि पंधरा - सोळा वर्षापूर्वी वडिलांनी चूक केली होती, हे स्पष्ट करून राजकारण करणारी ही निडर, बेडर मुलगी आहे. वडिलांच्या पक्षातून वडिलांसह बाहेर पडून नवीन पक्षाची स्थापना करून त्याची धुरा सांभाळते आणि हौतात्म्याची सुध्दा तयारी ठेवते.

हल्ल्यातून 'बाल बाल' बचावते. अतिरेक्यांना धडा शिकवत, युध्द करून, पण त्यांच्या वैचारीक पण मानसिक मनपरिवर्तनाला प्राधान्य द्यावे असे सांगते. शेजारील राष्ट्र - धर्मबांधवांचे संरक्षण म्हणून थयथयाट करते, पण मुहाजिरांच्या कत्तली आपल्याच देशात करते. हे मुहाजीर कोण आहेत? १४ ऑगस्ट १९४७ (पाकिस्तान स्वातंत्र्य दिन) व १५ ऑगस्ट १९४७ ( भारताचा स्वातंत्र्य दिन) या दोन दिवसानंतर पाकिस्तानात गेलेले मुसलमान! त्यांची हत्या चालूच आहे.

तो प्रश्न सोडविणे सोडून कश्मीरचे स्वप्न पाहिले जात आहे. यावर 'कश्मीर की बेटी' आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी मांडण्याचा प्रयत्न करते. 'गद्दार' मध्ये हुकूमशाहीविरूध्द आवाज उठविणाऱ्या देशप्रेमीची हत्या केली जाते आणि त्यांचा मुलगा टॉर्चरिंगला भिऊन बापाविरूध्द वृत्तपत्रातून लिहितो. बापाच्या मृतदेहाला लाथ मारून थुंकतो. जगण्यासाठी गडबडाऽऽऽ लोळू लागतो. या दोन्ही कथा त्वेषयुक्त झाल्या आहेत. देशमुखांच्या नसानसात समाजप्रेम व देशमुख - अभिमान भिनलेला आहे, हे प्रत्ययास येते.